
आनंद चित्र
राजबंदी

स्वानंद-चित्र

# रायगडचा राजबंदी

## कथासार

पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठीं फोंड्याच्या लढाईंत गुंतलेल्या संभाजीराजांना तूर्त गोमंतकाचा विचार बाजूला ठेऊन पाटीवर आलेल्या मोंगलांना तोंड द्यायला माघारीं यावें लागलें. दुर्दैवानें फसगत झाली व हा सह्याद्रिचा सवाई सर्जा सुताच्या सरक गांठींत सांपडला. संभाजीराजे कैद झाले. औरंगजेबाच्या छावणींत जल्लोस उफाळला. संभाजी राजांना धाक दाखवून शरण आणण्यासाठीं प्रयत्न सुरूं झाले. छळ हेटाळणीनं त्यांना नामोहरम करण्याचें उपाय योजण्यांत आलें. मोहक प्रलोभनं दाखविण्यांत आलीं. शरण अगर मरण यापैकीं एक पर्याय स्वीकारण्यासाठीं त्यांच्यापुढें प्रश्न टाकण्यांत आला. पण उपाशी सिंहही गवत खात नाहीं—

या प्रलोभनांचा आणि छळाचा संभाजी राजावर कांहींच परिणाम झाला नाहीं. तुच्छतेनें त्याच्याकडे पाहीलं. ते आपल्याच तंद्रित होते. त्यांच्या डोळ्यापुढें गतकाळाचा चित्रपट तरळूं लागला. शिवरायांचा प्रताप आठवला. रामदासाचे बोल आठवले. सती गोदावरीचा निर्धार आठवला. राजे या मातीची आठवण ठेवा हे बोल कानांत घुमू लागले.

काळ नदीच्या कांठावर गोदावरीची प्रथम भेट झाली. शिकारीहून थकले भागले युवराज संभाजी पाणी पिण्यासाठीं पाणवठ्यावर आले. ओंजळीनं पाणी पिऊं लागले. गोदावरीनं त्यांना निर्मळ पाण्यानं भरलेलं फुलपात्र नेऊन दिलं. नांव गावाची विचारपूस झाली. तिच्या मधुर बोलण्यानं आणि मोहक सौंदर्यानं युवराजांना भूल पडली, ते बेचैन झाले. परत पाणवठ्यावर येऊं लागले. दुसऱ्या भेटीत तिचं लग्न झाल्याचं त्यांना कळलं. ती सासरी जाणार ही वार्ता कळतांच त्यांचं चित्त ठिकाणावर राहिलं नाहीं. ती आपल्यापासून दूर जाणार ही कल्पनाच त्यांना सहन होईना. या मोहवश अवस्थेंत युवराजांनी ती सासरच्या वाटेवर असतांच धाड घालून पळवलं व लिंगाणा किल्ल्यांत बंदिस्त करून ठेवलं.

शिवाजी महाराज या वेळीं प्रतापगडी होते. गोदावरीच्या जखमी बापानं जिजामातेकडे फिर्याद गुदरली. जिजामातेनं न्याय मिळेल असें अभिवचन त्यांना दिलं. आपल्या लाडक्या नातवाच्या विरुद्ध न्याय द्यायचा, त्यांच्या मनांत नीती न्यायाचं व मायाममतेचं द्वंद सुरूं झालं. या अपराधाला शिवाजीराजांचा न्याय अतिशय कडक होता—शिरच्छेद !

शिवाजी महाराजांच हेरखातं अत्यंत तत्पर होत. संभाजी राजांनी एका विवाहित मुलीला पळवून भ्रष्ट केली ही बातमी त्यांच्या कानांवर जातांच त्यांच्या अंगाचा भडका उडाला. ते द्रुतगतीनं रायगडाकडे निघाले. लिंगाणा किल्ल्यावरून गोदावरीची सुटका केली. किल्लेदाराला कडक शासन करून पाचाडला मासाहेबांकडे आले—

आई मुलाची ती भेट अविस्मरणीय झाली. मासाहेब– न्याय देण्यासंबंधीचे धडे आपणच आम्हांला दिले. उज्वल चारित्र्यानंच राष्ट्र तरतं हे आपणच सांगितलंत. संभाजी राजांचा अपराध भयंकर आहे— न्याय नाती जाणत नाही — आपला आणि परका हा भेद त्यांत नसतो— अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. आपली ममता आड येऊ नये— शिवाजी राजांनी शिरच्छेदाची शिक्षा सुनावली—शिरच्छेद युवराजाचा शिरच्छेद— लाडक्या नातवाचा शिरच्छेद—संभाजी राजांचा शिरच्छेद—कल्पनाच सहन करवत नाहीं— या अपराधावर पडदाही पाडता येत नाहीं.

या पुढील घटनांची साक्ष रुपेरी पडद्यावाचून कोण देऊं शकेल ?

## गाणें नं. १

**मुबारक बेगम**

चश्मे पैमाना उठाले अश्क आहे भरी
होशभी बेहोश हुए आग जो दिल में लगी
ख़ाक परवाने जले परवाना करती है शमा
खाक मिलते मुस्कुराये दिलफना ए दिल्लगी
मरनाहि हैं ऐसे मरो की जो न मरते है सभी
मौत रोये मरने परभी जी उठे यह जिंदगी

## गाणें नं. २

**सुमन कल्याणपूर**

तुंग रायगड राजगजेंद्रच उभार झुकता झोक
विशाल गंडस्थळ गजशुंडा दुर्गम टकमक टोक
काळ नदीतील प्याया पाणी खाली झुकवी माथा
वृंदावनीं झुळझुळते अजुनी ती अश्रुंची गाथा ॥
ठेविली जपूनी मनोमनी जी व्यथा
ते वृंदावन सांगते सतीची कथा ॥
जरि चंद्र कलंकित निर्मल तें चांदणें
अंधार उजळता लांछन हो देखणे ॥
तें भाव विमोहन करि पावन जीविता
कुणी कांहीं म्हणो जनगंगेचे गाणें
ते सती चरित कुजबुजती सरिता रानें
मोडुनी मनोरथ जिंकियलें मन्मथा ॥

## गाणें नं. ३

**सुमन कल्याणपूर**

सुटेना माहेराची मिठी
कीं आला जासुद घेऊन चिठी ॥ १ ॥
दो डोळ्यांची सृष्टी आसवी
माऊलीची ती दृष्टी कासवी
पापणीची शिंपली लाविती
अंगी चंदन उटी ॥ २ ॥
जाता ओलांडूनी उंबरा
ओढीत ममता धरूनी पदरा
दुखवाया का आले उदरा
आणि आज ही कशी सुनी हो
कण्व मुनींची कुटी ॥ ३ ॥

पाण्यावरती आल्या गाई
तुझीया गंगा मायी
सांज वेळची सरती घाई–सांज वेळची घाई
ठेव ओळखी ग वनराई
पुसती पाऊले आज उमटली
काळ नदीच्या तटी ॥ ४ ॥

## गाणें नं. ४

**सौ. आशा भोसले**

सकाळी उठोनि मुख पहावं आईचं
दारी वृंदावनी रोप तुळशी माईचं ॥
पतिव्रतेची पुण्याई माझ्या अंगणी तुळस ।
झळाळे ग पानोपानी तिच्या तेजाचा कळस ॥
शाम सुंदराची सखी सौभाग्याचे वरदान ।
घर कुळाची थोरवी देई निश्चयाचे वाण ॥
देई जीवाला उजळा काळी तुळशी मंजुळा ।
तिची पावन सावली पापी करील पांगळा ॥
करी मंगल मंगल सान तुळशीच पान ।
सती सीता तिचे ठायी वसे देव नारायण ॥

## गाणें नं. ५

**सौ. आशा भोसले**

ही गुणाची गोजिरी ग गौर माझी साजिरी
कोणत्या ग दूर देशी सोडुनिया रायरी
चालली गोदावरी ।
साज घाला सोनियाचा कंकणे हिरवा चुडा
पाटली बिंदी बिजोरा गळसरीचा आकडा
केशरी कुंकू कपाळी साजते ही लाजरी
चालली गोदावरी ।

सनई मंजुळ वाजतें हा सुगंधाचा सडा
नादति घन दुदुंभि झडतो गडावर चौघडा
दूर रानी ऐकूं येई मोहनाची बासरी
चालली गोदावरी ।

लागली हुरहुर जीवा चिंब डोळ्यांच्या कडा
पाहता हे रूपरागी जात ऐन्यला तडा
दृष्ट काढा ग सईनी लोण राई मोहरी
चालली गोदावरी ।

वाट ही विसरूं नको माहेरची माझे सखी
ये कधी काळी मुली ग ठेव बाई ओळखी
ग नको पाहूं वळोनी जा सुखे जा सासरी
चालली गोदावरी ।

## गाणें नं. ६

**सुमन कल्याणपूर**

आनंद मनीं माईना कसं ग सावरूं
घे गगन भरारी उडूं पाहे पाखरूं
आनंद मनीं माईना ।

भर दुपारची सावली । लपतसे जशी पाऊली
मी बाळ तुझे माऊली । सुख संयागी रडणें
कसं ग आवरूं । घे गगन भरारी उडूं पाहे पाखरूं
आनंद मनीं माईना ।

किती फुले लते तळी गळली
किती पायदळी चुरगळली
खुडली ती उरली सुरली
या जीवनी क्षण विरता डोळे पाझरूं
घे गगन भरारी उडूं पाहे पाखरूं
आनंद मनी माईना ।

घे उडी मना घे उडी
आली रे मिलन घडी
दे साडुनी दुबळी कुडी
क्वचित तरी ही ममता
छाया ही धरूं
घे गगन भरारी उडूं पाहे पाखरूं
आनंद मनी माईना।

## गाणें नं. ७

**पिराजी सरनाईक आणि मंडळी**

दार उघड बये दार उघड
- मातले असूर निर्दाळी
घे त्रिशूळ हातीं आतां भद्रकाळी
उदो–उदो–उदो–

श्री महांकाळ कोपला वीर बलिभद्र
आकांत भयंकर तांडव करतो रुद्र
खवळली भूतें ही पाच, कराया नाच प्रलय संचरला
वादळांत अवघा भूमिभाग विंचरला

कीं मेघ डफावर कडकड वाजे विजली
डमडमले डमरू सूर्यमालिका विझली

बेभान करी थैमान पेटले रान जलाशय फुटले
घोंघावत वारे सुटले अस्मानी वादळ उठले
आभाळ कोसळे उठती डोंगरलाटा
निखळल्या चांदण्या पृथ्वी गोल उफराटा

" वन्हि तो चेतवावा रे चेतविताच चेततो
केल्यानें होत आहे रे आधीं केलेंच पाहिजे "
कडकडली डफावर थाप, होय थरकांप धडकली छाती
सांडूनी रक्त सिंचली मराठी माती
" मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा
जयजय रघुवीर समर्थ "

मावळातल्या मर्द मराठ्या घेई संतांचे वाण
तुला श्री शिवरायाची आण
ऊठ, ऊठ सांडले रक्त हे देई तुला आव्हान
तुला श्री तुळजाईची आण
भवानी तल्वारीची आण

स्वातंत्र्य हिंदवी रक्षाया घे तळहातावर प्राण
ल्हवी आपुले राष्ट्र निशाण
उडवी रिपुची दाणादाण
तुडवित रिपुदल टापाखालीं घोड दौड संचरे
हरहर हर महादेव गर्जती सह्याद्रीची शिखरे
हरहर महादेव, हरहर महादेव

शिवनेर पुरंदर प्रतापगड तोरणा
हा उभा रायगड स्वातंत्र्याचा कणा
हे चंदन वंदन अजिंक्य गड लिंगाणा
रक्तानें न्हाला पन्हाळगड कोंडाणा
जी, जी, जी

परदास्य स्तुतीनें सुजली तुटली तोंडे
फोडिले ठायिच्या ठायि कुन्हाडि दांडे
कापिली शिरें ती निवडूंगाची बोंडे
रणरंगी फुलले पळस, तंबुचे कळस तणावें तुटती
मुंग्यांची पडली धाड वारूळावरती– जी–जी–जी

ऐचले विषारी साप, अरींचे पाप लागता धाप ठेकती गुडघे
मोंगली जुलूम गुर्मिचे बांधले थडगे

" अभक्ताचा क्षयो झाला आनंदवन भूवनी "
प्रसन्न झाली अंबा स्फुरली स्वातंत्र्याची गाणी
अर्घ्य द्यावया ओंजळ धरली उदंड झाले पाणी

भद्रा भीमा गोदा वरदा कृष्णा इंद्रायणी
महाराष्ट्राच्या ललाटरेषा जनजीवनदायिनी
नाशिक त्र्यंबक आळंदी ही पैठण पंढरपुरी
तुळजामाता मायभवानी सोन्याची जेजुरी
शाळु बाजरी गहूं हरबरा तूर ऊस लवथवे
कुळीथ साळी ज्वारी नाचणी पीक सुगीला नवे

महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र माझा
रक्त फुलांनीं रणीं बांधली तुझी महापूजा
परकीयांत खडे चारिलें विजयाचे चौघडे
महाराष्ट्र मंदिरावरी हा भगवा ध्वज फडफडे
जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र

**पार्श्वगायक :**

सौ. आशा भोसले, सुमन कल्याणपूर, रामदास कामत, जयवंत कुळकर्णी
पोवाडा सरनाईक आणि मंडळी

निर्मिती स्थळ : **फिल्म इन्स्टीटयुट ऑफ इंडिया पुणें**

रसायन स्थळ : **बॉम्बे लॅबोरेटरीज प्रा. लि. मुंबई.**

आशा प्रिंटरी मुंबई ४.

स्वानंद चित्र

# "रायगडचा राजबंदी"

दिग्दर्शक : राजा ठाकूर

निर्माता : राजा बढे

संगीत : डी. पी. कोरगांवकर

प्रमुख भूमिका : **सुलोचना, चित्तरंजन कोल्हटकर, चंद्रकांत गोखले, बाळकोबा गोखले, माई भिडे, बेबी नयन, वसंत शिंदे** आणि **दुर्गा खोटे.**

शिवाय

सुधाताई सांगविकर, गणपत पाटील, जयशंकर दानवे, मोकाशी माणिकराव जाधव, दिनानाथ टाकळकर, जावडेकर, आ. दे. पाटील, अंजनीबाई, मनोहर दिघे.

| | | |
|---|---|---|
| कथा ... | : ... | **द. गो. गोडसे** |
| पटकथा व संवाद | : ... | **पु. भा. भावे** |
| पद्यरचना | : ... | **राजा बढे** |
| छाया लेखन | : ... | **मधुकर खारकर** |
| ध्वनि लेखन | : ... | **रेड्डी, विष्णुपंत चव्हाण,** |
| गीत मुद्रण | : ... | **बि. एन. शर्मा** |
| संकलन | : ... | **मधुकर नाईक** |
| रंगभूषा .. | : ... | **रामचंद्र नारायण सुर्वे** |
| वेशभूषा ... | : ... | **बबन आयतोळे** |
| कला | : ... | **के. द. महाजनी** |
| स्थिर चित्रण | : ... | **डी. व्ही. राव** |

सूत्रधार :

**अनंत जोशी**

सहाय्यक :

दिग्दर्शन : **सुभाष भुरके**, **शरद निफाडकर**, **कुळकर्णी**

गीतमुद्रण : **सोपान खडसे**

छाया लेखन : **किसनराव पवार**

संकलन : **शरद माणगांवकर**, **विनायक वाघधरे**

रंगभूषा : **बी. आर. टक्के**

निर्मिती : **चोंबे, दिघे, सखाराम**

वेशभूषा : **बबनराव**

कला : **मारोतराव जांभोळकर**

---

जागतिक हक्क : **सर्वोदय फिल्मस् डिस्ट्रीब्युटर्स** ४ ए, नाझ बिल्डींग, मुंबई-४.